


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष २ रे | अंक : ६५७. वा | शनिवार | दि. २० जानेवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# रामलल्ला हे राष्ट्रीय अस्मितेचे प्रतिक; २२ जानेवारीला मर्यादा पुरुषोत्तम दिन म्हणून घोषित करा, हिंदू महासभेची मागणी...

वृत्तसंस्था/मुंबई

अयोध्येत रामलल्ला प्राणप्रतिष्ठा २२ जानेवारी या दिवशी होत असून तो दिवस मर्यादा पुरुषोत्तम दिन म्हणून घोषित करण्यात यावा, अशी मागणी हिंदुमहासभेच्या वतीने राष्ट्रपती द्रोपदी मुर्मु आणि केंद्र शासनाकडे करण्यात आली आहे. याबाबत हिंदु महासभेचे राष्ट्रीय नेते दिनेश भोगले यांनी सांगितले की, हिंदू महासभेच्या वतीने, तत्कालीन फैजाबाद जिल्हाध्यक्ष स्वर्गीय ठाकुर गोपालसिंह विशारद यांनी रामलल्लाच्या दर्शन, पूजेचा अधिकार मिळण्यासाठी दिवाणी न्यायालयात (३/१९५०) वादपत्र प्रस्तुत करुन न्यायालयीन लढा सुरु केला होता. रामजन्मभूमीची विवादीत २.७७ एकर जमीन हिंदू महासभा, निर्मोही आखाडा आणि वक्फ बोर्डला समान विभागून देण्याच्या अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या दिनांक ३० सप्टेंबर २०१० च्या निर्णयाविरोधात हिंदू महासभेने न्यायालयात धाव घेतली होती. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या रामलल्ला विराजमानच्या बाजूने दिलेल्या निर्णयामुळे हिंदू महासभेने लढलेल्या प्रदीर्घ लढ्याची इतिश्री झाली आहे. या निर्णयामुळे विवादीत रामजन्मभूमी अखंड हिंदूकडे आली आहे. श्रीरामाच्या प्राणप्रतिष्ठेक्षणी शतकांपासूनचा संघर्ष समाप्त होऊन समस्त हिंदूना रामलल्लाच्या दर्शनाचा, पुजेचा मुक्त अधिकार प्राप्त होणार आहे, असं ते म्हणाले. त्यामुळेच हिंदू महासभेची धारणा आहे की, हा दिवस राष्ट्रीय दृष्टीने खुप महत्वाचा आणि विलक्षण आहे. रामलल्ला हे राष्ट्रीय अस्मितेचे प्रतिक आहेत. श्रीराम हिंदूचे उच्च श्रद्धेयस्थान आहेय समस्त हिंदू त्यांना मर्यादा पुरुषोत्तम मानतात. समस्त हिंदूच्या या धारणेस अनुसरुन, हिंदू जनभावनांचा आदर राखण्यासाठी आणि २२ जानेवारीचा राममंदिराच्या गर्भगृहातील, विलक्षण, अद्भुत, आनंदमयी, मंगलमय रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठेचा सोहळा निरंतर अविस्मरणीय रहावा, यासाठी हा दिवस मर्यादा पुरुषोत्तम दिन केंद्र शासनाने घोषित करावा, अशी मागणी अखिल भारत हिंदू महासभेच्यावतीने निवेदनात करण्यात आली आहे.



## पार्ट टाइम जॉबचं आमिष, तरुणाला सायबर गुन्हेगारांचा गंडा, सोशल मीडियावरुन १० लाखांची फसवणूक

वृत्तसंस्था/अमरावती

हॉटेल बुकिंगचा पॉर्ट टाइम जॉब करून चांगलं कमिशन मिळवण्याचं आमिष दाखवत एका तरुणाची तब्बल १० लाख ३८ हजारांची फसवणूक करण्यात आली आहे. या प्रकरणी तरुणाच्या तक्रारीवरून सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरातील गुरुकृपा कॉलनी येथील रहिवासी प्रतीक गजाननराव चिकटे (३०) याच्यासोबत ऑनलाइन फसवणूक करणाऱ्याने सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरून संपर्क साधला आणि त्याला फेक मेसेज पाठवून ऑनलाइन हॉटेल बुकिंगच्या पार्ट टाइम नोकरीचं आमिष दाखवलं. या कामासाठी चांगले पैसे मिळतील असंही त्याला सांगण्यात आलं.सुरुवातीला प्रतीक यांना या नोकरीतून फायदा झाला. पण त्यानंतर ते चोरट्यांच्या जाळ्यात अडकले. वेगवेगळी कारणं सांगून त्याला ऑनलाइन रक्कम पाठवण्यास भाग पाडण्यात आलं. अशा पद्धतीने फसवणूक करणाऱ्यांनी त्याची १३ डिसेंबर ते २० डिसेंबर २०२३ या कालावधीत तब्बल १० लाख ३८ हजार ७४४ रुपयांनी



फसवणूक केली. या प्रकरणी तरुणाने सायबर ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. सऱ्या एका घटनेत तरुण व्यावसायिकाची ४ लाख ३४ हजार ७१६ रुपयांनी फसवणूक करण्यात आली. शहरातील शिवकृपा कॉलनी येथील रहिवासी कापड व्यावसायिक हितेश संजय नानवाणी (२८) याच्यासोबत सायबर गुन्हेगाराने सोशल मीडिया प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून संपर्क साधला. ब्राईट ऑप्शन कंपनीमध्ये चांगल्या पगाराची नोकरी मिळवून देण्याची बतावणी करून सायबर गुन्हेगारांनी त्याला वेगवेगळ्या खात्यांमध्ये ४ लाख ३४ हजार ७१६ रुपये जमा करण्यास भाग पाडलं. १ जून ते २९ डिसेंबर २०२३ दरम्यान हा प्रकार घडला. पैसे भरूनही नोकरी न मिळाल्याने आपली फसवणूक झाल्याचं लक्षात आल्यावर हितेश यांनी सायबर ठाण्यात तक्रार दाखल केली.

## वृद्धेकडील रोख व दागिने अज्ञात चोरट्यांनी केले लंपास...

जनसंचलन/मोताळा

एक ७७ वर्षीय वृद्ध महिलेच्या सोन्याच्या दोन पोत आणि रोख तीन हजार असा ५३ हजारांचा मुद्देमाल दोन अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना १८ जानेवारी रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास आठवडी बाजारात घडली आहे. बोराखेडी पोलिसात गुन्हा दाखल केला. येथील प्रभाग क्र. १५ मधील रत्नाबाई वानखेडे या बाजार करीत असताना त्यांच्याकडे दोन अनोळखी व्यक्ती आले आणि गरिबांना साडी-चोळीचे वाटप सुरू असल्याचे सांगून त्यांच्या गळ्यातील दहा ग्रॅम वजनाच्या दोन सोन्याच्या पोत आणि रोख असलेले तीन हजार रुपये असा एकूण ५३ हजार रुपयांचा मुद्देमाल घेऊन पसार झाले, अशी फिर्याद रत्नाबाई वानखेडे यांनी पोलिसात दिली.



# शासनाचे स्वच्छ भारत अभियान कागदावरच ग्रामीण, शहरी भागात कचऱ्याचे साम्राज्य,कोट्यवधी रुपये पाण्यात...

**जनसंचलन/ लोणार**

शासनातर्फे ग्रामस्वच्छता अभियान राबवून जनजागृती केली जात आहे, परंतु लोणार तालुक्यासह परिसरातील अनेक गावांमधील कचरा ओढ्यानजीक, गावच्या स्वागत कमानीच्या बाजूला, रस्त्यावर किंवा तलावाच्या बंधाऱ्याच्या बाजूला, ओढ्यामध्ये , घनकचऱ्याच्या नावावर खुल्या असलेल्या जागेत टाकून दिला जात असल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे. यामुळे स्वच्छ भारत अभियान हे केवळ कागदावरच गिरवले जात असल्याचे दिसून येत आहे. दिवंगत ग्रामविकास मंत्री आर. आर. पाटील यांच्या कार्यकाळात ग्रामस्वच्छता व नागरी स्वछता अभियान प्रभावीपणे राबवले गेले होते. दरम्यान त्यावेळी कित्येक ग्रामपंचायतींना पुरस्कारही मिळाले होते. कित्येक ग्रामपंचायती राष्ट्रीय स्तरावर यशस्वी झाल्या होत्या. प्रत्येक पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायतीच्या प्रवेशद्वारावर ग्रामस्वच्छता पुरस्कार प्राप्त गाव असे फलक लावले जात होते. परंतु सद्यस्थितीला या गावच्या प्रवेश व्दाराजवळच कचऱ्याचे साम्राज्य निर्माण झाल्याचे सर्वत्र दिसून येत आहे. घनकचरा व्यवस्थापनासाठी शासन स्तरावरून कोट्यवधी रुपये खर्च केले जातात. मात्र प्रत्यक्षात घनकचऱ्याची कितपत व्यवस्था होते हा प्रश्न अनुत्तरितच आहे. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत घनकचरा व्यवस्थापनासाठी गावोगावी लाखो रुपये खर्चुन घनकचऱ्याचे व्यवस्थापन केल्याचा दिखावा होत नाही ना आसा प्रश्न उपस्थित होत आहे ? कचरा हा प्रश्न कायमच आहे. कारण कोणत्याही गावात गेले तरी गावच्या वेशीवर, ओढ्याच्या कडेला, मोकळ्या जागेत कचऱ्याचे साम्राज्य हे नेहमीच दृष्टीत पडत आहे. खरंतर घनकचरा व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीने अनेक कायदे आहेत. नियमांचे पालन करून कचरा व्यवस्थापन केल्यास पर्यावरण राखले जाऊ शकते, असा विश्वास शासन प्रशासनाला आहे.




ओल्या व सुक्या कचऱ्याचे वर्गीकरण करून ओल्या कचऱ्यापासून विशिष्ट पध्दतीने त्याला रोज ओले करून कुजवून खत निर्मिती करणे असा उदात्त हेतू ही त्यामागे आहे. परंतु हे कितपत साधले जाते हा प्रश्नच आहे. आज जवळपास बहुतांश नगर पालिका व ग्रामपंचायती मध्ये घनकचरा व्यवस्थापनासाठी सिमेंट टाक्या तयार केलेल्या नाहीत. स्वच्छ भारत मिशन अभियानांतर्गत जिल्हा परिषदेकडून माहिती मागीतल्यास त्यात गावागावांत व्यवस्थापन होते का हे सिद्ध होईल? हा सुध्दा प्रश्न तितकाच महत्त्वाचा आहे, परंतु प्रत्यक्षात मात्र वेगळेच आहे. लोकसंख्येच्या आधारावर मिळणाऱ्या या निधीतून अनेक नगर पालिका, ग्रामपंचायतींनी सिमेंटच्या टाक्याच बनवल्या नसल्याचे चित्र आहे. शासनाच्या घनकचरा व्यवस्थापन योजनेमध्ये कित्येक ग्रामपंचायती अपयशी ठरलेल्या आहेत. संपूर्ण राज्यात प्लास्टिक बंदी किंवा प्लास्टिकचा वापर कमी करण्याबाबत अंमलबजावणी होत असतानाच गावामध्ये मात्र प्लास्टिकच्या पिशव्यांचा ढीग पडत असल्याचे चित्र आहे.

# मातृतिर्थ सिंदखेड राज्याची सुकन्या कविता जाधव पाठारे मिसेस इंडिया २०२३ ची विजेता...

**जनसंचलन/सिंदखेडराजा**

मातृतिर्थ सिंदखेड राजाची सुकन्या कविता विनायकराव जाधव-पाठारे यांना अलीकडेच फॉरएव्हर स्टार इंडिया (एफ.एस.आय.ए) मिसेस इंडिया महाराष्ट्र २०२३ ची विजेती म्हणून गौरविण्यात आले. एफ.एस.आय.ए. ही भारतातील सर्वात मोठ्या सौंदर्य स्पर्धांपैकी एक म्हणून ओळखली जाते - या २०२३ वर्षीचा ग्रँड फिनाले जयपूरच्या मॅरियट हॉटेलमध्ये आयोजित करण्यात आला होता. कविता ह्या मूळची सिंदखेड राजा जि.बुलडाणा येथील रहिवासी आहे आता मुंबईत राहतात. त्या भारतीय कपास निगम चे महाव्यवस्थापक व्हि. जी.जाधव (विनायक गोपाळा जाधव) सिंदखेड राजा यांच्या त्या कन्या आहेत तसेच बुलडाणा जिल्हा पत्रकार संरक्षण समितीचे कार्यध्यक्ष पत्रकार बाबासाहेब जाधव यांच्या भगीनी आहे. कविता जाधव पठारे यांनी हे प्रतिष्ठेचे विजेतेपद पटकावले आहे. भारतातील एका आघाडीच्या फॅशन इन्स्टिट्यूटमध्ये सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत असून एक पत्नी, एक आई, एक मुलगी, एक बहीण आणि एक शिक्षिका आदी भूमिका कविता यशस्वीरित्या निभावताना आता मिसेस महाराष्ट्र म्हणून त्या नृत्य, लेखन या त्यांच्यात असणाऱ्या अनेक प्रतिभा समाजासमोर दाखवत आहेत . या स्पर्धेसाठी त्यांनी मनापासून ग्रूमिंग कार्यशाळा, रॅम्प वॉक, फॅशन सामग्री आणि ब्रँडसाठी खास सोशल मीडियाचा उपयोग केला . त्यांच्या बहु-प्रतिभाने प्रभावित होऊन, तिला एफ. एस.आय.ए.च्या अवॉर्ड्स नाईटसाठी सन्माननीय अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आले होते, जिथे त्यांनी सुपरस्टार मलायका अरोरा खानसोबत स्टेज शेअर केला होता. कठोर परिश्रम आणि समर्पण नेहमीच फळ देते आणि स्त्रिया देखील यशस्वी होऊ शकतात आणि विशिष्ट वयात सर्व क्षेत्रात त्यांची बालपणीची स्वप्ने साध्य करू शकतात याचा त्या स्वतः जिवंत पुरावा आहे.



शिवाय, हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की कविता यांनी नुकताच सहा महिन्यांपूर्वीच पेन्ट्रीच्या दुनियेमध्ये प्रवास सुरू केला होता आणि त्या या क्षेत्रात अगदी नवीन असून या ठिकाणी दररोज नवनवीन उंची गाठत आहेत आणि अनेक सौंदर्य स्पर्धांची विजेती म्हणून त्यांची स्वप्ने पूर्ण करत आहेत . इतक्या कमी वेळेत. कविता यांनी २०२३ मध्ये पुण्यात ताज इव्हेंट्स आणि प्रॉडक्शन्सने आयोजित केलेल्या मिसेस इंडिया फर्स्ट रनर-अप आणि मिसेस फॅशन आयकॉनचे पहिलेच विजेतेपद जिंकले आणि तेव्हापासून त्या या स्पर्धेत अखंडपणे कार्यरत आहेत . कविता सांगतात, प्रत्येक मुलीने आयुष्यात एकदा तरी सौंदर्य स्पर्धेत सहभागी होण्याचे स्वप्न पाहिले पाहिजे , मी देखील वयाच्या १८ व्या वर्षी १९९४ मध्ये मिस इंडियासाठी अर्ज केला होता, तेव्हा मी ते काही अपरिहार्य कारणांमुळे करू शकले नाही पण आता नंतर वर्षानुवर्षे, मला असे वाटले की मी पुन्हा एकदा प्रयत्न करते आणि मी खूप आनंदी आहे की मी स्वतःवर विश्वास ठेवला आणि एक संधी वयाच्या ४८ व्या वर्षी मिळाली आणि त्या संधीचं मी सोनं केलं .. तुमच्या वयाचा याच्याशी काहीही संबंध नाही, फक्त जिद्द आणि धैर्य असणे, आत्मविश्वास असणे, उत्कटता आणि विश्वास असणे आवश्यक आहे. आंबेडकरी बौद्ध महिला म्हणून, या व्यासपीठाचा उपयोग महिला आणि तरुण मुलींना, विशेषतः वंचित समूहातील महिलांना सक्षम करण्याचा त्यांचा मानस आहे. महिलांनी आणि समुदाय आणि त्यांना घाबरू नका आणि पुढे जा आणि विश्वासाची झेप घ्या त्यांची स्वप्ने. कविता सध्या त्यांच्या स्वतःच्या यशाची चव चाखत आहे आणि स्पष्टपणे म्हणते की, ङ्गङ्गहो...ये तो बस शुरुआत है ! अभि और असमान छूना बाकी हैं ! अबला ठरविलेल्या महिलेने तिचे पंख पसरवायचे आहेत आणि तिची प्रतिभा अधिक मोठ्या प्रमाणात या जगाला दाखवायची आहे असे त्या म्हणाल्या .या क्षेत्रात भविष्यात मॉडेल आणि अभिनेत्री म्हणून मीडिया उद्योगात मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध असून हा स्पर्धेचा चांगला प्लॅटफार्म यासाठी उपलब्ध आहे.


**मराठा महिला अर्बन**

को-ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी लि, बुलडाणा

पत्ता. ग्रीन वर्ल्ड नर्सरी जवळ, चिखली रोड, सुंदरखेड, बुलडाणा

**पाहिजेत**

| अ.क्र. | पदमान | शैक्षणिक अहर्ता | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | शाखाधिकारी | पदधिकारी (G.D.C & A) शाखधिकारी पदाचा किमान ५ वर्षाचा अनुभव. | ०१ |
| २ | लिपीक | पदविधर / कोणत्याही सहकारी पतसंस्थेतील किमान ३ वर्षाचा अनुभव | ०५ |
| ३ | कर्जअधिक्षक | पदविधर / कोणत्याही सहकारी पतसंस्थेतील किमान ३ वर्षाचा अनुभव | ०२ |
| ४ | शिपाई | १० वी (अनुभव असल्यास प्राधान्य) | ०२ |
| ५ | पिगमी एजेन्ट | पदविधर / १२ वी (अनुभव असल्यास प्राधान्य) | ०६ |
| ६ | वाहन चालक | १२ वी (अनुभव असल्यास प्राधान्य) | ०१ |

इच्छुक उमेदवार यांनी आपल्या बायोडाटा / शैक्षनिक कागदपत्रे व पासपोर्ट फोटो सहखालील ई-मेल वर पाठवावा. marathamahilaurban157@gmail.com

तसेच मुलाखतीची वेळ आणि दिनांक संपर्क करुन कळविण्यात येईल

माहितीसाठी संपर्क

सोनु राऊत (हॉटेल मराठा चिखली रोड, बुलडाणा)

मो. ९६२३५ ५३३३३, ९१५८०००१५७ वर कॉल करु शकतात.


*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# वन बुलढाणा मिशनची २२ ला श्रीराम वंदना यात्रा...

## मातृतीर्थ सिंदखेड राजा ते संतनगरी शेगाव काढणार रथयात्रा...



जनसंचलन/बुलढाणा

२२ जानेवारीचा दिवस संपूर्ण भारतासाठी ऐतिहासिक ठरणार आहे. अयोध्येत प्रभू श्रीराम मंदिरात श्रीराम मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. हा ऐतिहासिक सोहळा स्मरणीय करण्यासाठी संदीप शेळके यांच्या नेतृत्वातील वन बुलडाणा मिशनने पुढाकार घेतला आहे. २२ जानेवारीला वन बुलडाणा मिशनच्यावतीने मातृतीर्थ सिंदखेडराजा ते संतनगरी शेगाव अशी श्रीराम वंदना यात्रा काढण्यात येणार आहे. राजमाता जिजाऊंना वंदन करून सकाळी ५:४५ ला या यात्रेला सुरुवात होणार असून यात्रा रात्री ८ वाजता संतनगरी शेगावात पोहचणार आहे. वन बुलडाणा मिशन या राजकीय लोकचळवळीला जिल्ह्यात प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. संदीप शेळकेंच्या संवाद सभांना होत असलेली गर्दी अन् त्यातही मुद्द्याचे राजकारण यामुळे संदीप शेळके यांची लोकप्रियता वाढत चाललेली आहे. दरम्यान आता श्रीराम मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या निमित्ताने त्यांच्याकडून आयोजित करण्यात आलेल्या श्रीराम वंदना यात्रेची देखील जिल्ह्यासह राजकीय वर्तुळात विविध अर्थाने चर्चा सुरू आहे. श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचा विषय हा राजकीय नाही तर राष्ट्रीय स्वाभिमानाचा विषय आहे. प्रभू श्रीराम चंद्राचे जन्मभूमीत मंदिर होणे ही गौरवाची बाब आहे. त्यामुळे हा ऐतिहासिक सोहळा स्मरणीय व्हावा यासाठीच श्रीराम वंदना यात्रा असल्याचे वन बुलडाणा मिशनचे संकल्पक संदीप शेळके यांनी सांगितले. बुलडाणा जिल्ह्याचा सर्वांगीण विकास हा आपला अजेंडा आहे, त्यामुळे जिल्ह्याच्या मांगल्यासाठी आपण प्रार्थना करणार असल्याचे ते म्हणाले. मातृतीर्थ सिंदखेडराजा नगरीतून सुरू होणारी श्रीराम वंदना यात्रा किनगाव राजा, वीरपांग्रा, बिबी, मांडवा, मलकापूर पांग्रा, शेंदुर्जन, साखरखेर्डा, लव्हाळा फाटा, मंगरूळ नवघरे, अमडापुर, उदयनगर, खामगाव मार्गे संतनगरी शेगावात दाखल होणार आहे. यात्रेदरम्यान गावोगावच्या मंदिरात पुजन होणार आहे. इंडीयन आयडॉल फेम सुप्रसिद्ध गायक राहुल खरे या यात्रेदरम्यान गीतरामायण तसेच राम भक्तीची गीते सादर करणार आहेत.

# ग्रंथालय पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन...

जनसंचलन/बुलढाणा



ग्रंथालय संचालनालयाकडून उत्कृष्ट ग्रंथालयांना पुरस्कार देण्यात येतात. या पुरस्कारांसाठी अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचा गुणात्मक विकास व्हावा, ग्रंथालयांकडून जनतेला अधिक चांगल्या ग्रंथालय सेवा उपलब्ध करुन द्याव्यात, वाचन संस्कृती वृध्दींगत करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे, यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार, तसेच ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते व सेवकांना भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. शियाली रामामृत रंगनाथन यांच्या नावे डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता आणि सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कार देण्यात येतो. राज्यातील शहरी आणि ग्रामीण विभागातील उत्कृष्ट शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना अनुक्रमे १ लाख रुपये, ७५ हजार रुपये ५० हजार रुपये, २५ हजार रुपये रोख रक्कम आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येते. राज्यातील एक राज्यस्तरीय उत्कृष्ट कार्यकर्ता आणि एक राज्यस्तरीय उत्कृष्ट ग्रंथालय सेवकांना प्रत्येकी ५० हजार रुपये रोख रक्कम आणि प्रमाणपत्र, तसेच राज्यातील प्रत्येक महसुली विभागातील प्रत्येकी एक उत्कृष्ट कार्यकर्ता आणि उत्कृष्ट सेवकांना प्रत्येकी २५ हजार रुपये रोख रक्कम आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येते. सन २०२२-२३च्या पुरस्कारासाठी इच्छुक असणारे ग्रंथालये, कार्यकर्ते व सेवकांनी विहित नमुन्यातील अर्ज दि. २२ जानेवारी ते ९ फेब्रुवारी २०२४ पर्यंत तीन प्रतीत जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाकडे सादर करावेत, असे आवाहन प्र. ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांनी केले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज हॉलीबॉल चषकाचे आमदार संजय गायकवाड यांच्या हस्ते उद्घाटन



जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजय गायकवाड यांच्या माध्यमातून बुलडाणा शहरांमध्ये भव्य दिव्य क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. आज १९ जानेवारी २०२४ रोजी बुलढाणा शहरातील जिजामाता प्रेक्षागार येथे आमदार संजय गायकवाड यांच्या संकल्पनेतून तथा धर्मवीर आखाडा बुलडाणाच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज हॉलीबॉल चषकाचे भव्यदिव्य उद्घाटन आज संपन्न झाले. यावेळी उद्घाटनप्रसंगी १८ वर्षाखालील मुले कोल्हापूर विरुद्ध पुणे तसेच १८ वर्षाखालील मुली कोल्हापूर विरुद्ध नागपूर या हॉलीबॉल सामन्याने सुरुवात करण्यात आली. यावेळी उपस्थित असलेल्या खेळाडूंची ओळख परेड संपूर्ण मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये झाली. आमदार संजय गायकवाड यांनी उपस्थित असलेल्या संपूर्ण हॉलीबॉल खेळाडूंना जिंकण्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या तसेच बुलडाणा शहरांमध्ये होत असलेल्या भव्य क्रीडा स्पर्धामध्ये सहभागी झाल्याबद्दल सर्व खेळाडूंची मनःपूर्वक अभिनंदन केले.

यावेळी त्या ठिकाणी प्रमुख उपस्थिती तथा उद्घाटक म्हणून आमदार संजय गायकवाड, युवानेते मृत्युंजय संजय गायकवाड, धर्मवीर आखाडा अध्यक्ष पृथ्वीराज संजय गायकवाड, क्रीडा विभागीय उपसंचालक संतान सर, विभागीय सचिव संजय नाईक सर, अरविंद गवई, शिवाजी पाटील, संतोष गजभिये, पंत सर, प्रीतम खोत, जीवन उबरंडे, नितीन नेमाने, विशाल खंडारे, स्वप्नील पाटील, नितीन पाटील, दीपक तुपकर, ज्ञानेश्वर खांडवे, यांच्यासह असंख्य हॉलीबॉल खेळाडू उपस्थित होते.

# रामलल्ला प्रतिष्ठापने निमित्त शोभायात्रेत विद्यार्थ्यांना सहभागी करून संस्कारशील बनवावे - राधेश्यामजी चांडक

जनसंचलन/बुलढाणा



राजमाता जिजाऊने ज्याप्रमाणे रामायाण महाभारताच्या गोष्टी सांगून शिवबा घडविले त्याप्रमाणेच आपल्या मुलांवर श्रीरामांच्या पराक्रमाच्या गोष्टी सांगुन संस्कार करावेत ज्यामुळे भावी पिढी आदर्श होईल असे आवाहन रामलल्ला प्रतिष्ठापनेच्या समारंभा निमित्त सद्भावना सेवा समितीचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक यांनी केले. दि. २२ जानेवारीला रामलल्ला प्रतिष्ठापना जरी अयोध्याधाम मध्ये होत असली तरी शहरामध्ये माता, भगिनी, विद्यार्थी, पुरुष सर्वांमध्ये प्रचंड उत्साह आहे. दि. २० जानेवारीला सद्भावना सेवा समिती, श्रीराम मारोती मंदिर संस्थान, श्रीराम नवमी शोभायात्रा समिती सुवर्णनगर गणेश मंदिरापासुन शहरातुन भव्य शोभायात्रा काढणार आहे. शोभायात्रेचा समारोप संगम चौक, जयस्तंभ चौक, भगवान महाविर मार्ग, भारत माता चौक यामार्गाने जाऊन शेवटी श्रीराम मारोती मंदिरात महाआरती होईल. शहरातील सर्व महिला मंडळाच्या ५०० महिला लाल रंगाच्या साड्या परिधान करुन मंगल कलश यात्रेत सहभागी होतील. सर्व महिलांनी गायत्री मंदिरात कलश सजावट केली श्रीराम नवमी शोभायात्रा समिती तर्फे श्रीरामाची भव्य मुर्ती सजावट केलेली रथामध्ये आरुढ होणार आहे. बुलडाणा अर्बन वेदशाळेचे विद्यार्थी वेदपठण करतील, श्री हनुमानजीची भव्य मुर्ती, दिंडी पथक, शोभायात्रेचे आकर्षण राहील. जयस्वाल महिला मंडळ केवट प्रसंगची झांकी सादर करणार आहेत. जयस्वाल परिवाराचे कु. आरोही, कु. माही, स्वराज व कृष्णा अनुक्रमे श्रीराम, सीता, लक्ष्मण व केवट रुपात राहणार आहेत. अंशुमन जयस्वाल पिरवार सक्रिय सहभाग या प्रसंगात आहे. वर्मा परिवार तर्फे श्रीराम भरत भेटीचा देखावा सादर करणार आहेत. चि.अर्पित, चंद्रेश, ऋषीकेश, कु. आरोही, आरुष वर्मा अनुक्रमे श्रीराम, लक्ष्मण, सीता, भरत, केवटच्या भुमिकेत राहतील. शबरी राम प्रसंग पुर्वा, शिल्पा, आर्य, विशिका जयस्वाल, माधवी नाईक अनुक्रमे श्रीराम, लक्ष्मण, सीमा, शबरी, मुनीच्या वेशात राहतील. राम दरबार प्रसंगात सिध्दी, रिधीमा, माही, धनुष जयस्वाल देखावा सादर करणार आहेत. माहेश्वरी समाज महिला मंडळ तर्फे शिव दरबारचा देखावा सादर होणार आहे. नमन, रेयांश डोडीया, इशिका, जानवी, गोपाल गांधी शिव, पार्वती, कार्तीकेय, गणेशच्या भुमीकेत राहतील. गुरव समाज महिला मंडळ तर्फे श्रीराम रामेश्वर पुजनचा देखावा कु. गीता सपकाळे, कु. दिशा घोरपडे, कु. सिध्दी दळवी, ओम चिंचोळकर अनुक्रमे श्रीराम, सीता, लक्ष्मण व हनुमानच्या भुमीकेत राहणार आहेत. सुवर्णनगर क्र. ९ प्रभागातील नगरसेवक वैभव इंगळे व त्यांचा मित्र परिवार यांनी शोभायात्रेच्या गणपती मंदिराचा परिसर पुर्ण स्वच्छ करून जलपान व्यवस्था केलेली आहे सर्व समाजाच्या महिलांनी गायत्री मंदिरात मंगल कलशची सजावट केली. संपूर्ण शहरात रामलल्ला प्रतिष्ठापन उत्सव हा दिवाळी प्रमाणे उत्साह आहे प्रत्येक समाज व मंडळे या शोभायात्रेत सहभाग मिळावा यासाठभ प्रयत्नशील आहेत. शोभायात्रेत सहभागी होणाऱ्या प्रत्येकावर शुभ संस्कार होतील म्हणून प्रत्येकाने आपल्या मुलांना भव्य शोभायात्रेत सहभागी करावे असे अवाहन सद्भावना सेवा समितीचे अध्यक्ष राधेश्याम चांडक यांनी केले.

# बुलढाणा पोलिसांनी जिल्ह्यातील अडीच वर्षीय मुलीवर झालेल्या अमानुष अत्याचाराबाबतचा चौकशी अहवाल- विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांना पाठवला...

वृत्तसंस्था/मुंबई
बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा तालुक्यातील तरवाडी गावात १७ वर्षीय मुलाने अडीच वर्षाच्या चिमुकल्या मुलीवर बलात्कार केल्याची घटना २४ नोव्हेंबर,२०२३ रोजी घडली होती. सदर घटनेची महाराष्ट्र विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी तात्काळ गंभीर दखल घेत आरोपीवर कारवाई करण्याचे लेखी निर्देश दिनांक २४ नोव्हेंबर,२०२३ रोजी दिले होते. त्याची बुलढाणा पोलीस अधीक्षकांनी तात्काळ दखल घेत आरोपीवर कारवाई केली आहे. त्याबाबतचा सविस्तर अहवाल पोलीस अधीक्षकांनी उपसभापती डॉ. गोऱ्हे यांना सादर केला आहे. यामध्ये, गुन्हा घडल्यानंतर सदर आरोपीला तात्काळ अटक करून बुलढाणा मुख्य न्याय दंडाधिकारी यांनी आरोपी हा अल्पवयीन असल्याने बाल सुधार गृहात दाखल करावे असे आदेश दिले होते. त्यानुसार आरोपीला सध्या बाल सुधारगृहात ठेवले आहे. सदर आरोपीस जामीन मिळू नये याबाबत पोलीस काळजी घेत आहेत. तसेच पीडितेच्या पुनर्वसनासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. तसेच तिला मनोधैर्य योजनेचा लाभ मिळवून देणेचा प्रयत्न सुरू आहे. पीडीतेला न्यायालयात सक्षम सरकारी वकील मिळावा याबाबत न्यायालयाला विनंती केली असल्याचे अहवालात म्हटले आहे. पोलिसांनी तत्परतेने घटनेची सखोल चौकशी करून आरोपीस तात्काळ अटक केली. तसेच याबाबत आवश्यक अहवाल केला. या कारवाईबाबत उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी समाधान व्यक्त केले आहे. सदर घटनेवर यापुढेही लक्ष ठेऊन असल्याचे त्यांनी सांगितले.



# अवैध सावकारी करणाऱ्या महिलेच्या घराची विशेष पथकाद्वारे झडती...

## आक्षेपार्ह दस्तऐवज व धनादेश ही पथकाने केले जप्त...



जनसंचलन/बुलढाणा
अवैध सावकारी करणाऱ्या मोताळा तालुक्यातील महिलेच्या घरी आज, शुक्रवारी सहकार विभागाच्या विशेष पथकाने झडती घेतली. पोलीस संरक्षणात करण्यात आलेल्या संयुक्त कारवाईत आक्षेपार्ह कागदपत्रे, दस्तावेज आणि धनादेश जप्त करण्यात आले. मोताळा तालुक्यातील कुऱ्हा येथील वंदना देवसिंग धोती या महिलेच्या घराची विशेष पथकाने झाडाझडती घेतली. जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा उप निबंधक नानासाहेब चव्हाण यांच्या पथकाने झडती घेतली. यावेळी संशयास्पद कोरे धनादेश, कोरे बॉण्ड पेपर, हिशोबाच्या नोंदी असलेल्या वह्या जप्त करण्यात आले. याची पडताळणी करून महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ नुसार कार्यवाही करण्यात येणार असल्याचे चव्हाण यांनी सांगितले. सविस्तर वृत्त असे की तक्रारदार दीपक शेळके यांनी दिलेल्या तक्रारीनुसार श्रीमती वंदना देवसिंग घोती या अवैध सावकारीचा व्यवसाय करतात त्यांच्याकडून २,५०,००० रुपये वेगवेगळ्या तारखेला १०%,१२% व १५% व्याज दराने घेतले होते. त्यानंतर फिर्यादी यांनी एप्रिल पर्यंत ५०,०००० रुपये परत केले फिर्यादी यांनी त्यांना दिलेले चेक व बॉण्ड परत मागितले असता ते देण्यास टाळाटाळ करत होते चेक बाउन्स करण्याच्या धमक्या दिल्या होत्या. भारतीय स्टेट बँक चा चेक बाउन्स करून प्रकरण न्यायालय टाकलेले सुद्धा आहे पैसे न दिल्यास जीवे मारण्याची धमकी सुद्धा त्यांनी दिली होती त्यामुळे फिर्यादी यांना आत्महत्या केल्याशिवाय पर्याय उरलेला नव्हता असे माहिती त्यांनी दिलेल्या तक्रारीत आहे. सदर कार्याची पडताळणी करून ही कारवाई जिल्हाधिकारी, बुलढाणा तथा अध्यक्ष जिल्हा सनियंत्रण समिती आणि मा. पोलीस अधीक्षक बुलढाणा, जिल्हा उपनिबंधक नानासाहेब चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सावकारी पथकातील श्री एस के गारोळे पथक प्रमुख तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था खामगाव, श्री जी जे आमले सहकार अधिकारी श्रेणी १, यु .के सुरडकर, श्री डी बी बोंडे, आर ए डहाके, आर बी बाबर, श्रीमती एस के घाटे, कु. आर बी शिरसाट, एन एस सोनुने, सी.एम गोंधळेकर, पोलीस प्रशासनातील भाग्यश्री पवार, धीरज रवी चंदन, तसेच पंच म्हणून जोशी व जाधव तहसील कार्यालय मोताळा यांनी ही कारवाई केली आहे.

# बेरोजगारांना रोजगार व शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळावा यासाठी राष्ट्रवादीचे डफडेबजाव आंदोलन ...




जनसंचलन/बुलडाणा
राज्यातील बेरोजगारी व शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळावा याकरिता राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे पार्टीचे प्रदेशाध्यक्ष महबूब शेख यांच्या यांच्या नेतृत्वाखाली आज दि १९ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार घोषणाबाजी करत डफडे बजाव आंदोलन करण्यात आले. जिल्हाभरात अतिवृष्टी झाल्याने शेतकऱ्यांच्या पिकाचे नुकसान होऊन दुबार पेरणीचे संकट शेतकऱ्यांवर आले. जिल्ह्यात प्रामुख्याने कपाशी व सोयाबीन पिकाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते यावर्षी कपाशीचे भाव ६५०० सोयाबीनचे भाव ४ हजार हे मागील भावाच्या खूप कमी असून लागवडीला लागलेला खर्च सुद्धा या दरामध्ये निघत नसल्याने शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे. तसेच सध्याचे सरकार खाजगीकरणाच्या धोरणावर चालणारी असून नवीन रोजगारांच्या संधी पूर्णपणे संपुष्टात आले आहे कंत्राटी पद्धतीने भरती करण्याचा डाव शासन करीत असून यामुळे युवकांना शाश्वत रोजगार मिळणे देखील कठीण झाले आहे. नवीन ९ कंपन्यांना कंत्राटी भरतीचे कंत्राट देऊन सुशिक्षित बेरोजगारांची थट्टाच चालवल्याचे दिसून येत असल्याचा आरोप दिलेल्या निवेदनात करण्यात आला आहे. बेरोजगारांना रोजगार मिळावा व शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळावा याकरिता आज राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश अध्यक्ष महबूब शेख यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करत डफडेबजाव आंदोलन करण्यात आले यानंतर जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. निवेदनावर राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष पराग पाटील अवचार, कैलास जाधव संगीतराव भोंगळ डॉ ज्योती गाडेकर, नरेश शेळके, संगीतराव भोंगळ, डॉ रिजवान खान राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बुलढाणा शहराध्यक्ष अनिल बावस्कर वैभव पवार शेख समीर शेख इमरान शेख युसुफ शेख अंशू माऊली शहा रफिक शहा दानिश शेख आशिष पाणझोडे यांच्यासह असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958